पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

***दिनांक- ०४/१०/२०१९***

## *गडचिरोली पोलीस दलाने नक्षलवादयांचा घातपाताचा डाव उधळला*

- **पोलीसांची मोठी कारवाई नक्षलवादयांनी पुरुन ठेवलेला मोठा शस्त्रसाठा जप्त**
- **विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर गडचिरोली पोलीस दलाची नक्षलवादयाविरोधात मोठी कारवाई**

उपविभाग पेंढरी अंतर्गत येत असलेल्या मौजा पेंढरी जंगल परिसरात सी-६० कमांडो आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नक्षलविरोधी अभियान राबवित असताना सी-६० कमांडोजला नक्षलवादयांनी घातपाताच्या दृष्टीने तयारी करुन पुरुन ठेवलेल्या भुसुरुंगासाठी वापरण्यात येणारे साहीत्याविषयी माहीती मिळाली. सदर माहीतीवरुन काल सायंकाळी शोध अभियान राबवित असतांना सी-६० कमांडोजला नक्षलवादयांनी घातपात करण्यासाठी व मोठी हानी करण्यासाठी पुरुन ठेवलेले साहित्य १४ नग २ इंच मोटार सेल, १४ हँड ग्रेनेड, १५ किलो जिलेटीन, ५ ते ७ किलो जिवंत स्फोटक असलेला प्रेशर कुकर डिटोनेटरसह, १ कुकर बॉंब आयईडीसह, वायर बंडल, नक्षली गणवेष (डांगरी), लाल व पांढऱ्या रंगाचे कापडी नक्षल बॅनर, आरसीआयडी स्वीच, विदयुत साहीत्य, पँकीग साहीत्य व नक्षली लिखित साहीत्य अशा मोठया प्रमाणात साहीत्य जप्त करण्यात आले. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर गडचिरोली पोलीस दलाला मिळालेले हे मोठे यश आहे. यामुळे नक्षलवादयांचा घातपाताचा कट पोलीस दलाला उधळुन लावण्यात यश प्राप्त झाले आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी या यशस्वी कामगिरी करणाऱ्या सी-६० कमांडोजचे अभिनंदन केले आहे.





